# नव्या करारातील पत्रे

### मंडळ्या आणि पुढाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रेषितांनी पत्रे लिहिली.


मुलांना शिकविणाऱ्यांनी L2b हा अभ्यास वाचावा.

### 1. प्रार्थनापूर्वक वचनातून तुम्ही स्वतः तयारी करा.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू येशू, तुझे तुझ्या लोकांवर खूप प्रेम आहे आणि तुझ्या प्रेषितांनी लिहिलेली पत्रे त्यांना समजावीत तसेच आज्ञापालन करावे अशी तुझी इच्छा आहे. त्यांना मदत करण्यासाठी माझे साहाय्य कर आमेन''

येशूच्या निवडलेल्या शिष्यांपैकी पाच जणांनी विश्वासणाऱ्यांना आणि त्यांच्या पुढाऱ्यांना पत्रे लिहिली. आमच्यासाठी पवित्र शास्त्रातील नव्या करारात नमूद करून ठेविलेली आहेत.

**याकोब,** पेत्र, योहान, यहूदा, आणि पौल ह्या प्रेषितांनी पत्रे लिहिली. या सर्वांनी येशूला पाहिले होते. त्यांनी हे लिखाण पहिल्या ख्रिस्ती शतकात केले. या लेखांना पत्रे म्हणतात.



**याकोब,** हा येशूचा भाऊ होता. येशूवर विश्वास ठेवून तो विश्वासणारा झाला आणि त्याने यरूशलेमेतील विश्वासणाऱ्यांचे पुढारीपण केले. इस्राएलाचे बारा वंश संपूर्ण रोमन साम्राज्यात विखूरले गेले. त्या बारा वंशातील यहूदी ख्रिस्ती लोकांना त्याने पत्र लिहिले याकोबाचे पत्र म्हणून ते प्रसिद्ध आहे. देवाच्या वचनाचे काय केले पाहिजे हे त्याने याकोब 1:22 मध्ये सांगितले आहे ते पाहा.

**पेत्र,** येशूने त्याला त्याचा मासे धरण्याचा व्यवसाय सोडून आपल्या मागे येण्यास सांगितले आणि तो त्याचा शिष्य झाला, त्याने जाहीरपणे येशूची ओळख नाकारली, तरी त्याने पश्चात्ताप केला आणि याकोबाच्या समवेत यरूशलेमेमधील विश्वासणाऱ्यांचे पुढारीपण केले. त्याने रोमन साम्राज्यातील विविध भागांमध्ये राहणाऱ्या ख्रिस्ती लोकांना त्याने पेत्राचे पहिले व दूसरे पत्र अशी दोन पत्रे लिहिली. छळ होत असतांनाही ख्रिस्ती लोकांनी विश्वासात दृढ राहावे म्हणून त्यांना उत्तेजन देण्यासाठी त्याने पत्रे लिहिली. येशूसाठी दु:ख सोसणाऱ्यांना देवाने पेत्राच्याद्वारे कोणते अभिवचन दिले ते 1 पेत्र 5:10 मध्ये पाहा.

**योहान,** ह्याला येशूने बोलावण्यापूर्वी तो बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचा शिष्य होता. त्याला येशूविषयी अत्यंत जिव्हाळा होता आणि इतरांनी ही देव व एकमेकांविषयी असाच जिव्हाळा दाखवावा यासाठी तो प्रोत्साहन देत असे. त्याने योहानाचे पहिले पत्र सर्व ख्रिस्ती लोकांना तर योहानाचे दूसरे व तिसरे पत्र मंडळ्यांच्या पुढाऱ्यांना उद्देशून लिहिले आहे. त्याने पहिले पत्र का लिहिले याची दोन कारणे 1 योहान 1:4 व 5:13 मध्ये पाहा.

**यहूदा,** हाही याकोबाप्रमाणेच येशूचा भाऊ होता आणि तोही यरूशलेमेमधील पुढारी झाला. खोटे शिक्षक विश्वासणाऱ्यांची फसवणूक करून त्यांच्यापैकी काही जणांना वाईट मार्गाकडे वळवीत होते, त्या संबंधात इशारा देण्यासाठी त्याने यहूदाचे पत्र लिहिले. त्याने पत्र लिहिण्याचे कारण यहूदा 1:5 मध्ये नमूद केले आहे ते पाहा.

**पौल** (तार्सकर शौल) याची येशूने त्याला रोमन साम्राज्यातील अनेक शहरांमधील यहूदीतर लोकांकडे पाठविले. रोमकरांस, करिंथकरांस, गलतीकरांस, इफिसकरांस, फिलिप्पैकरांस, कलस्सैकरांस आणि थेस्सलनिकाकरांस

ही पौलाने लिहिलेली पत्रे नव्या करारात जतन केलेली आहेत. तसेच त्याने नव्या पुढाऱ्यांनाही पत्रे लिहिली. यात फिलेमोन, तीमथ्य व तीत यांचा समावेश आहे. यहूदी ख्रिस्ती लोकांना जुन्या करारातील पशुंच्या यज्ञार्पणाकडे वळण्यापेक्षा मसीहा येशूवर भरवंसा ठेवण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी बहुधा पौलाने इब्री लोकांना पत्र लिहिले असावे पौलाने करिंथकरांस पत्र का लिहिले ते 1 करिंथ 4:14 मध्ये पाहा.

प्रेषितांनी त्याकाळात बहुसंख्य लोकांना वाचता येणाऱ्या ग्रीक भाषेत लिखाण केले. त्यांनी इतरही काही पत्रे लिहिली. पण त्यांचा नव्या करारात समावेश केलेला नाही. विश्वासणारे प्रेषितांच्या पत्रांची नक्कल करून इतरांकडे ती पाठवीत असत (पाहा कलस्सै 4:16).



पुढे पूर्व भूमध्य समुद्राचा नकाशा दिला आहे. त्यामध्ये कोणत्या शहरांना ही पत्रे लिहिली ते पाहा.

**2. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या आठवड्यातील कार्यक्रम ठरवा.**

- तुम्हाला वरचेवर भेट देणे शक्य नसणाऱ्या विश्वासणाऱ्यांच्या आणि मंडळ्यांच्या) नावांची यादी करा.
- त्यांनी तुमच्याकडून काय शिकणे गरजेचे आहे यावर चर्चा करा.
- त्या प्रत्येकासाठी प्रार्थना करा.
- पौला प्रमाणेच त्यांना प्रोत्साहन देणारे पत्र लिहा पत्रावर तुम्ही सर्वांनी सह्या करा.

**3. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या उपसनासभेची योजना आखा.**

पत्रे का लिहिली ह्याची कारणे वर भाग 1 मध्ये दिली आहेत. त्यांचे स्पष्टीकरण करून सांगा तसेच ख्रिस्ती लोकांनी येशूच्या आज्ञांचे पालन केले तसे प्रेषितांच्या आज्ञांचेही पालन केले हेही सांगा.

विश्वासणाऱ्यांनी पत्रांमधील त्यांची आवडती वचने पाठ म्हणून दाखवावीत.

मुलांना त्यांनी तयारी केलेली नाटिका व प्रश्न सादर करण्यास संधी द्या.

पौलाने ज्या शहरांतील लोकांना पत्रे लिहिली ती शहरे नकाशात दाखवा.



नकाशातील नावे-रोम थेस्सलनिका, फिलिप्पै, कलस्सै, गलतीया, करिंथ, इफिस, भूमध्य समुद्र, इस्राएल पाच प्रौढांना याकोब, पेत्र, योहान, यहूदा आणि पौल ह्यांचे प्रतिनिधित्व करण्यास सांगा. पुढे दिल्याप्रमाणे स्वतःची ओळख करून द्या आणि मग वर भाग 1 मध्ये दिल्याप्रमाणे तुमच्याविषयी वस्तुस्थिती स्पष्ट करा.

**याकोब:** ''मी याकोब, आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताचा सख्खा भाऊ. यरूशलेमेतील विश्वासणाऱ्यांची मी देखभाल करीत असे. याकाळात विश्वासणाऱ्या यहूदी लोकांशी माझा वाद होत असे; कारण त्यांना आपल्या प्रभूच्या नव्या करारातून कष्ट न करता, मिळालेल्या कृपेवर विश्वास न ठेवता, जुन्या करारातील नियमशास्त्राकडे जायचे होते.''

**पेत्र:** ''मी पेत्र, बरोबर. तोच मासे धरणारा. अभिवचनाने देऊ केलेल्या मसीहा विषयीची भाकिते येशूने पूर्ण केल्याचे मला लवकरच पहायला मिळाले. कैसरीया शहरात पहिल्या यहूदीतर विश्वासणाऱ्यांवर पवित्र आत्मा आल्याचे मी पाहिले ते फार अद्‌भुत होते! तथापि, यामुळे यरूशलेमेमधील यहूदी लोकांच्या मनात काही गंभीर प्रश्न उभे राहिले.

**योहान:** ''माझे नाव योहान, लोकांची खात्री व्हावी यासाठी मी स्वतः प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टी लिहिल्या. येशूचा बाप्तिस्मा झाला तेव्हा पवित्र आत्मा त्याच्यावर कबूतरासारखा उतरलेला मी पाहिला आणि स्वर्गातून झालेली पित्याची वाणीही ऐकली. येशूला मरणातून पुन्हा उठलेले मी पाहिले आहे.''

**यहूदा:** ''मी यहूदा येशूचा भाऊ. गालीलमध्ये आम्ही दोघे बरोबरच वाढलो. त्याने केलेला पहिला अद्‌भुत चमत्कार पाहून मी तर आश्चर्यचकित झालो; यावर विश्वास ठेवणे नासरेथातील इतर लोकांप्रमाणे मलाही जरा अवघडच गेले. परंतु त्याने जे सांगितले व केले त्यावरून तो देवाचा पुत्र होता हे लवकरच मला उमगले.

**पौल:** ''मी प्रेषित पौल. मी नियमशास्त्र कोटेकोरपणे पाळणारा परूशी होतो. तसेच ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्यांचा मी तिरस्कार करीत असे. मी त्यांचा निष्ठूरपणे छळ केला पण येशूने दमास्कसच्या वाटेवर स्वतः येऊन मला दर्शन दिले आणि मी ख्रिस्ती लोकांचा छळ करणे सोडले. येशूला त्याच्या गौरवी स्वरूपात पाहिल्यावर काही काळ मी आंधळा झालो. आता मी फक्त त्याचीच सेवा करतो.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी 1 योहान 1:7-10 वाचा प्रभूभोजन घेण्यापूर्वी आम्ही सर्वस्वी पवित्र अशा देवाकडे आमची पातके खरेपणाने कबूल करतो. तो आमची पातके आमच्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या सामर्थ्यशाली शुद्ध करणाऱ्या रक्ताने धुऊन टाकतो, ''हे आम्हाला ठाऊक आहे.''

विश्वासणाऱ्यांनी त्यांची जीवने प्रेषितांच्या पत्रांमधील शिक्षणाने कशा प्रकारे आशीर्वादित झाली याबद्दल स्तुतीपर साक्षी द्याव्यात.

**पाठ करा** 1 योहान 2:12-13. दोन किंवा तीन जणांचे गट तयार करून नव्या करारातील पत्रांवरून त्यांनी नुकत्याच शिकलेल्या सत्यांवर चर्चा करा, प्रार्थना करा, योजनांना मंजुरी द्या आणि एकमेकांना प्रोत्साहन द्या.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net